नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २३/०७/२०२५ (बुधवार)**

---

## अवैधरित्या विनापरवाना देशीदारू बाळगुन विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूध्द नविन कायदा भारतीय न्याय संहीता २०२३ मधील संघटीत गुन्हेगारी च्या कलमान्वये कारवाई ,मौदा पोलसांची कामगिरी

नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक २२/०७/२०२५** रोजी अवैधरित्या विनापरवाना देशीदारू बाळगुन विक्री करणाऱ्या आणि दारू पुरवाठा करणारे आरोपीतांविरूध्द दारूबंदी कायदा अंतर्गत विशेष मोहीम राबवुन मौदा पोलीसांनी कारवाई करून आरोपीतांवर गुन्हे नोंद करून ६,५१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे

आरोपी नामे १) दिलीप बबनराव खंडाळे, वय ५० वर्ष, रा. सावळी, २) चेतन ईश्वर बोरकर ,वय ३४ वर्ष, रा. सावळी, ता. कामठी ३) विनायक गोविंदराव सोनकुसरे वय ५५ वर्ष रा. ईतवारी ता. जि. नागपूर,४)तुळशीराम नत्थूजी भिल, वय ४७ वर्ष, रा. हनुमान मंदीर जवळ चिकना, पो. सालई गोणनी, नागपूर ५) गोपाल सुखराम बाभरे वय ३४ वर्ष रा. पेट्रोलपंप जि. भंडारा ६) ईद्रकुमार यादव,वय २२ वर्ष, रा. राजनांदगाव, राज्य छत्तीसगढ, ७) सुनिल बनवारी वय २९ वर्ष रा.कळमेश्वर ८) सुभाष रतन सोनवाणे वय ५५ वर्ष रा. जरीपटका नागपूर यांचेवर ९) मोतीराम सोमकुवर वय ५६ वर्ष रा. महालगाव, १०) बबलू भिवाजी चौधरी वय ५० वर्ष रा. महालगा, ११) अनिल भैयालाल उईके, वय ४२ वर्ष, रा. आसोली, १२) रविकांत मनोहरराव वाडीभस्मे, वय ३८ वर्ष, रा. आसोली १३) भिमराव दादुनाथ पुंड, वय ५० वर्ष, रा. महालगाव, आणि १४) महीला आरोपी अशा **आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ८ गुन्हे दाखल करून देशी दारू एकुण ६,५१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**या मध्ये अवैधरित्या देशीदारू विक्री करणारे आरोपी आणि त्यांना माल पुरवणारे आरोपी हे संघटीतपणे गुन्हा करीत असल्याने सदर गुन्हयात मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,**

**नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात मौदा पोलीसांनी भारतीय न्याय संहीता कलम ११२ (किरकोळ संघटीत गुन्हेगारी) हे कलम वाढ करणे बाबत प्रस्ताव श्री संतोष गायकवाड ,उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान यांच्या कडे सादर केला आहे.**

## नागपूर ग्रामीण जिल्ह्यात सायलेन्सर नसलेल्या किंवा सुधारित (मोडिफाईड) सायलेन्सर वापरणाऱ्या वाहनांवर कारवाई

**मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात** नागपुर ग्रामीण जिल्हा पोलिसांनी सायलेन्सरशिवाय किंवा सुधारित सायलेन्सर असलेल्या मोटार वाहनांविरुद्ध दिनांक २१/०७/२०२५ रोजीपासुन विशेष मोहीम सुरू केली असुन नागपुर ग्रामीण जिल्हयातील विविध पोलीस स्टेशनला कारवाई करण्यात आली आहे. असे वाहन ज्यामध्ये मूळ सायलेन्सर बदलून असे सायलेन्सर बसवले जातात जे खूप मोठा आवाज करतात. वाढत्या ध्वनी प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि वाहतूक नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी ही मोहीम राबवण्यात येत आहे. तसेच मोटार वाहन कायदा १९८८ मध्ये असे नमुद केले आहे की सार्वजनिक ठिकाणी मोटार वाहन चालवणारी कोणतीही व्यक्ती जी ध्वनी आणि वायू प्रदूषणाशी संबंधित विहित मानकांचे उल्लंघन करते ती शिक्षापात्र असेल.या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांना ओळखण्यासाठी आणि दंड करण्यासाठी वाहतूक पोलिस पथके संपूर्ण नागपुर ग्रामीण जिल्हयात नेमण्यात आलेली आहे. **नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांनी अशा २७ वाहन धारकांवर मोटार वाहन कायदयान्वये कारवाई केली आहे.**

## घरातुन निघुन गेलेल्या ३ अल्पवयीन मुलींचा २४ तासात घेतला शोध खापरखेडा पोलीसांची कामगिरी

दिनांक २१/०७/२०२५ रोजी खापरखेडा पोलीस स्टेशन येथे माहीती प्राप्त झाली की, दिनांक २०/०७/२०२५ रोजी खापरखेडा पोलीस स्टेशन हद्दीत राहणाऱ्या तीन अल्पवयीन मुली (तीन मैत्रिणी) घरच्यांच्या नावे त्या तिघी एकत्र जात असल्याबाबत चिठ्ठी लिहुन कोणालाही काहीही न सांगता घरातुन निघुन गेल्या आहे. त्यावरून प्रात्प पालकाच्या तक्रारीवरून

पोलीस स्टेशन खापरखेडा येथे कलम १३७(२) भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयांचे गांर्भिय लक्षात घेता खापरखेडा पोलीसांनी नमुद मुलींचा शोध घेण्यासाठी तात्काळ पथक तयार करून रवाना केले. नमुद पथकांनी तांत्रिक पुराव्यांवरून साखळी जोडत नमुद मुलींचा अवघ्या २४ तासात शोध घेवुन तिन्ही मुलींना दिनांक २२/०७/२०२५ रोजी बडनेरा येथुन ताब्यात घेतले. मुलींना त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## अवैधरित्या तारणा परीसरात बिबटयाचे ड्रोन कॅमेऱ्यांनी व्हिडीओ चित्रिकरण करणाऱ्यांवर गुन्हा नोंद

दिनांक २२/०७/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना माहीती मिळाली की, तारणा परीसरात सतिघाट तलावाजवळ उंच टेडीवरून आरोपी क्रं १) सागर दरशथ माकडे, वय २६ वर्षे,रा. मांढळ ता. कुही जि नागपुर ,आरोपी क्रं २) आशिष किशोर कुर्वे, वय ३३ वर्षे, रा. वग, ता. कुही जि नागपुर यांनी दिनांक १८/०७/२०२५ रोजी सांयकाळ चे ०५:०० वाजे च्या सुमारास शासनाकडुन तसेच संबधीत विभागाकडुन परवानगी न घेता तेथील टेकडी वरून **बिबटयाचे** ड्रोन कॅमेऱ्यांनी व्हिडीओ चित्रिकरण करून व्हायरल केल्याने त्यांनी महासंचालक नागरी उड्डान यांचे आदेशाने उल्लघंन केले असल्याने नमुद आरोपी विरूध्द कलम २२३ भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक २२/०७/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक २३/०७/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री दिपक अग्रवाल, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत जुनी वस्ती आणि सातगाव येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि एम.आय.डी.सी. चौक येथे नाकाबंदी केली. पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी बोरी अंतर्गत गंगापुर झोपडपट्टी येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले

आणि गार्डन चौक येथे नाकाबंदी केली. सदर कोबिंग ऑपरेशन श्री दिपक अग्रवाल यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन चे अधिकारी/अंमलदार हजर होते.




रित रसवंती
सेंटर





मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने